# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 378/2022 दिनांक : 02.10.2022

## 1)खुनः–

**शिवाजीनगर :–**दिनांक 30.09.2022 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहते घरासमोर डॉ. आंबेडकर नगर, नांदेड येथे,** यातील **मयत नामे यशपाल सोपानराव भिसे, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. आंबेडकर नगर, नांदेड**, यांस यातील नमुद सहा आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून मयत हा घराबाहेर उभा असतांना त्याचे शेजारी राहणारे नमुद आरोपीतांनी सांड पाणी व कचरा आमच्या घराजवळ का टाकतोस या कारणावरुन मयत यास धारदार हत्याराने हातावर व छातीवर मारुन खुन केला. वगैरे **फिर्यादी राहुल सोपानराव भिसे वय 45 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. आंबेडकर नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 306/2022 कलम 302,143,148,149 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.नं. 9403546846** हे करीत आहेत.

## 2)दरोडा :–

**उमरी :–**दिनांक 01.10.2022 रोजी 14.00 वा. ते 14.20 वा. चे दरम्यान**, सिंधी येथील व्हिपीके कारखान्याचे समोर कै. व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था सिंधी ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी हातात तलवारी, चाकु, घेवून व्हिपीके कारखान्याचे समोर कै. व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था सिंधी येथील बॅकेत कार्यालयीन कामकाज चालु असतांना बॅकेतील कर्मचारी यांचे हातातील मोबाईल खाली ठेवा म्हणुन कर्मचारी सुनिल शामराव कुरे यांचे हातावर तलवारीने मारण्याचा प्रयत्न केला व तलवार चाकुचा धाक दाखवून बॅकेतील कॅश काउंटर मधील 2,02,590/–रुपये दमदाटी करुन जबरीने घेवून पळुन गेले. लोकांच्या मदतीने एक आरोपीस पकडण्यात आले आहे. वगैरे **फिर्यादी हानुमंत सटवाजी जाधव, वय 32 वर्षे, व्यवसाय कॅशिअर रा. कानगाव ता. भोकर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 240/2022 कलम 395 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोनि/श्री भोसले, मो. नं. 7038833358** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**इस्लापुर :–** दिनांक 28.09.2022 रोजी 18.00 वा. ते दिनांक 29.09.2022 रोजी 10.00 वा. चे दरम्यान, **मौजे सेवादास तांडा केंद्र शिवनी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे राहते घराचे कडी कोंडा तोडुन घरात प्रवेश करून एल.इ.डी. टी.व्ही. किंमती 18,000/–रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी तानाजी गणपतराव कायपलवाड, वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. सेवादास तांडा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरन 94/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शेख, मो.क्रं. 9423438221** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 09.09.2022 रोजी 15.00 वा. ते 21.30 वा. चे दरम्यान, **डॉ. लेन नांदेड येथे,** यातील फिर्यादीची सी.टी. 100 कंपणीची मो सा क्रं एमएच–26/एजी–4888 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी प्रदिन दिगांबर पुरी वय 39 वर्षे रा. बारड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 345/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2444 कदम, मो.क्रं. 9921629005** हे करीत आहेत.

**2)देगलूर :–** दिनांक 29.09.2022 रोजी 22.00 वा. ते दिनांक 01.10.2022 रोजी 02.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासुचे घरापुढे मौजे खानापुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेलंडर प्लस कंपणीची मो. सा. क्रं टी. एस.–16/इटी–7972 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सतीष गंगाराम गायकवाड वय 31 वर्षे व्यवसाय मजुरी रा. सुकनी ता. कोटगीर जि. निजामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरन 467/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/सतीष गंगाराम गायकवाड, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 5)चोरी :–

**1)अर्धापूर** :–दिनांक 30.09.2022 रोजी 17.00 वा. ते दिनांक 01.10.2022 रोजी 05.30 वा. चे दरम्यान, **पांगरी शिवारातील शेत गट नं. 103 मध्ये ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने त्याचे पांगरी शिवारातील शेत गट नं. 103 मधील विहीरीवरील लक्ष्मी कंपनीची पाण्याची मोटार किंमती 10,000/– रुपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी साहेबराव शामराव हटेकर, वय 51 वर्षे, व्यवसाय शेती रा. पांगरी ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 283/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2544 आनेबाईनवाड, मो.क्र. 9529971005** हे करीत आहेत.

**2)मांडवी** :–दिनांक 20.09.2022 रोजी वेळ नक्की नाही, **मौजे रामजीनाईक तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे छप्री मध्ये ठेवलेले सांऊंड सिस्टम मधील डीजे मिक्सर जुने वापरते किंमती 6000/–रुपयाचे यातील नमुद आरोपीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी उमेश मोहन पवार, वय 35 वर्षे, व्यवसाय डेकोरेशन वा साऊंड सिस्टम चालवणे व शेती रा. रामजी नाईक तांडा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी** गुरनं 77/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/पठाण, मो.क्र. 9834841176** हे करीत आहेत.

## 6)अपघात :–

**1)बिलोली** :– दिनांक 20.09.2022 रोजी 20.00 वा. चे सुमारास, **कासराळी पेट्रोल पंपजवळ रोडवर कासराळी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संजय रामा जींके वय 38 वर्षे रा. गागलेगाव ता. बिलोली जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपी यांने त्याचा अँपे अँटो क्र. एमएच–26/एसी–4966 ही हयगय व निष्काळजीपणाने चालवून अँटो पलटी केल्याने मयत यांना गंभीर दुखापत झाली स.द. विष्णुपुरी नांदेड येथे उपचार चालु असताना मरण पावला त्याचे मरणास अँपे अँटो चालक कारणीभुत आहे. वगैरे **फिर्यादी मारोती रामा जिंके, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. गागलेगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं. 210/2022 कलम 279,337,338,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री बोधने, मो.क्र. 9890762000** हे करीत आहेत.

**2)बारड** :– दिनांक 29.09.2022 रोजी 19.00 वा. ते दिनांक 29.09.2022 रोजी 19.30 वा. चे दरम्यान, **महामार्ग पोलीस चौकी बारड समोर बारड ता. बारड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अमोल विठ्ठलराव भालेराव वय 26 वर्षे व्यवसाय शेती रा. सिता बोरगाव ता. मुदखेड जि. नांदेड व** फिर्यादी असे दोघे मिळुन नमुद ठिकाणावरुन मोटार सायकलने जात असताना यातील नमुद आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ट्रक क्र. आरजे–09/जी.डी.–4966 ही अचानक रोडच्या मध्यभागी इंडीकेटर न दाखवता ब्रेकमारुन थांबवली त्यामुळे फिर्यादी यांची मोटार सायकल ही ट्रकच्या पाठीमागे जावून जोराची धडकली त्यात यातील मयत यांना गंभीर दुखापत होवून मरण पावला त्याचे मरणास नमुद ट्रक चालक कारणीभुत आहे. वगैरे **फिर्यादी परमेश्वर प्रकाश काकडे, वय 29 वर्षे, व्यवसाय शेती रा. रोडगी ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं. 68/2022 कलम 279,338,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री भेंडेकर, मो.क्र. 8329824296** हे करीत आहेत.

**3)उस्माननगर** :– दिनांक 25.09.2022 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **मौजे हळदा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे राजू सोपान यलमिटवाड वय 29 वर्षे रा. हळदा ता. कंधार जि. नांदेड** हा शेतातून जनावरे घेवून पायी घराकडे येत असताना नमूद महिंद्रा कंपनीचे वाहन डिझेल वाहतुकीचे टँकर क्र. एच.एच.–20/बी.टी.–4728 च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे चालवून मयत यास पाठीमागून धडक दिल्याने डोक्यास गंभीर दुखापत होवून मरण पावला त्याचे मरणास नमुद डिझेल वाहतुकीचे टँकर चालक कारणीभुत आहे. वगैरे **फिर्यादी विलास सोपान यलमिटवाड, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. हाळदा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं. 166/2022 कलम 279,337,338,304(अ) भादवी सह कलम 184,134 मो.वा. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री केंद्रे, मो.क्र. 9823996314** हे करीत आहेत.

## 7)पळवुन नेले :–

**सोनखेड** :– दिनांक 28.09.2022 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **मौजे पळशी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद फिर्यादीचा **मुलगा नामे सुमित ज्ञानेश्वर वरळे वय 16 वर्षे व्यवसाय शिक्षण रा. पळशी ता. लोहा जि. नांदेड** यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी नमुद ठिकाणावरुन पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर शिवाजीराव वरळे, वय 40 वर्षे, व्यवसाय चालक रा. पळशी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 143/2022 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1927 भुते, मो.क्र. 02466–245033** हे करीत आहेत.

## 8)आत्महत्येस प्रवृत्त केले :–

**मनाठा :–**दिनांक 28.09.2022 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **पंडीत सोनाळे यांचे शेतात मौजे गायतोंड ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे माधव विठ्ठल भिसे, वय 57** वर्षे, **रा. गायतोंड ता. हदगाव जि. नांदेड** यास यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन उशाचे पैसे आत्ताच दे असे म्हणून धक्का बुक्की करुन मोटर सायकलवर बसून मयताचे शेताकडे घेवून गेले शेतात त्रास दिला त्यांच्या त्रासाला कंटाळून मयत यांनी शेतात विषारी औषध पिवून आत्महत्या केली त्यांना आत्महत्या करण्यास यातील नमुद आरोपीतांनी प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी कोंडबा माधव भिसे, वय 25 वर्षे, व्यवसाय शेतमजुरी रा. गायतोंड ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरन 152/2022 कलम 306,323,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री चिट्टेवार, मो.नं. 9834634149** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**<u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 379/2022 दिनांक : 02.10.2022</u>**

पोलीस अधिक्षक कार्यालयात " **महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री** " यांची जयंती साजरी

02 ऑक्टोंबर, 2022 रविवार रोजी " **महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री** " या महापुरुषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली आहे. **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले आहे. या प्रसंगी **पोनि अवधुत कुशे,** पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड, **पोनि व्दारकादास चिखलीकर,** स्थागुशा, नांदेड व ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार, कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन पोउपनि श्री उत्तम वाघमारे, पोना/संजय सांगवीकर, पोका विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


निंदा स्तुती कोणी न करी कोणाची ।
नाही या देहाची शुद्धी कोणा ।।